# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल च्या पास केंद्रांवर पाससाठी कॅशलेस सुविधेचा शुभारंभ

- **कॅशलेस पेमेंट सुविधेमुळे पास विक्रीच्या ज्या जुन्या सुविधा चालू आहेत त्यावर कोणताही परिणाम होणार नाही.**
- **पुणे महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. विक्रम कुमार यांच्या शुभहस्ते व परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत कॅशलेस सुविधेचा शुभारंभ.**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या सर्व पास केंद्रावरून विविध प्रकारच्या पासेसची विक्री केली जाते. परिवहन महामंडळास महिन्याला पास विक्रीतून सरासरी ५ कोटी रुपयाचे उत्पन्न प्राप्त होत असते. तर सरासरी ६० हजार पासची विक्री होत असते. परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांच्या संकल्पनेतून सोमवार, दिनांक २३ ऑक्टोबर २०२३ पासुन महामंडळाच्या सर्व ४० पास केंद्रांवर प्रवाशी नागरिकांना पाससाठी क्यू-आर कोडद्वारे पेमेंट करता येणार आहे.

पुणे महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. विक्रम कुमार यांच्या शुभहस्ते व परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे मनपा भवन पास केंद्र येथे कॅशलेस सुविधेचा शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त मा. श्री. विकास ढाकणे, पीएमपीएमएलचे सहव्यवस्थापकीय संचालक मा. श्री. नितीन नार्वेकर यांच्यासह सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या क्षेत्रिय प्रमुख आशा कोटस्थाने, मुख्य प्रबंधक श्री. अजय वाजपेयी, शाखा प्रमुख श्री. मनोजकुमार सिन्हा, पीएमपीएमएलचे चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) श्री. सतिश गव्हाणे, कामगार व जनता संपर्क अधिकारी श्री. सतिश गाटे, वाहतूक नियोजन व संचलन अधिकारी श्री. नारायण करडे, वाहतूक नियोजन अधिकारी (आय.टी.) श्री. विजय रांजणे, प्र. मुख्य अभियंता श्री. निवृत्ती भांडे, पास विभाग प्रमुख श्री. विकास मते, खाजगी बस विभाग प्रमुख श्री. समीर आत्तार, अपघात विभाग प्रमुख श्री. अशोक साबळे, सेंट्रल वर्कशॉपचे प्र. वर्क्स मॅनेजर श्री. राजकुमार माने, पुणे स्टेशन डेपो मॅनेजर श्री. संजय कुसाळकर, न.ता.वाडी डेपो मॅनेजर श्री. संतोष किरवे उपस्थित होते.

---

**या पद्धतीने होणार कॅशलेस पेमेंट**

१. पास केंद्रावरील कर्मचाऱ्याकडे ऑनलाईन क्युआर कोडची मागणी करणे.
२. क्युआर कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करणे.
३. पास केंद्रावरील कर्मचाऱ्याकडून पास प्राप्त करणे.

---

नवीन पिढी कॅशलेस सुविधेचा जास्त वापर करत आहे. नवीन पिढीला पीएमपीएमएल ने सुरू केलेल्या कॅशलेस सुविधेचा नक्कीच चांगला लाभ होईल. पीएमपीएमएल ने तिकिट व पाससाठी सुरू केलेली कॅशलेस सुविधा नक्कीच स्तुत्य आहे.

**-- मा. श्री. विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका**

---

पीएमपीएमएल च्या पास केंद्रांवर सुरू करण्यात आलेल्या कॅशलेस सुविधेचा वापर जास्तीत जास्त प्रवाशी नागरीकांनी करावा. कॅशलेस सुविधेमुळे कामात सुलभता येऊन काम जलद गतीने होण्यास मदत होते.

**-- मा. श्री. सचिन्द्र प्रताप सिंह, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

दि. २३/१०/२०२३.

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.

मा. स. कळावे.

sd/-

**कामगार व जनता संपर्क अधिकारी**

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---